# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१८/०९/२०१६

**१) लोखंडी कडयाने/फायटरने मारुन दुखापत केली व जिवाने मारण्याची धमकी दिली :—**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादी सुनील ताराचंद भवसागर वय ३१ वर्ष रा. तुमसर दारू पाज असे म्हटले असता त्याने माझेकडे पैसे नाहीत मि दारू पाजु शकत नाही असे म्हटले असता आरोपीने फिर्यादी सोबत झेंडा चौकात फिर्यादीचे घरी अनाधीकृत पणे प्रवेश करून फिर्यादी व त्याची पत्नी व वहीनी सोबत तोंडा—तोंडी भांडण करून शिवीगाळ करून फिर्यादीचे चेहे—यावर, दाढीवर हातात वापरलेल्या लोखंडी कडयाने/फायटरने मारहान करून त्याचे पत्नीला व वहीनीला गालावर थापड मारून फिर्यादीस दुखापत करून जिवाणे मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५२,३२४,३२३,५०४,५०६भांदवि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) पैश्याच्या कारणावरुन भांडण करुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली :—**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील आरोपी व फिर्यादी हे एकाच गावात राहत असुन फिर्यादीने आरोपीस शिविगाळ का करतेस मी तुझ्या पत्नीचे मजुरीचे पैसे दिले असे बोलला असता आरोपीने वेळेवर पैसे का दिले नाही असे बोलुन भांडण करुन फिर्यादीला काठीने नाकावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी रामचंद्र मन्साराम नान्हे वय ५४ वर्ष, रा. पालेपेंढरी यांचे व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६,भादवी. अवये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चनाप पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारादरम्यान मृत्यु . :—**

दिंनाक. २९/०८/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील मृतक सौ. गंगा ज्ञानेश्वर दिघोरे वय ३५ वर्ष, रा. ईटान याने आपल्या राहते घरी थिमेट विषारी औषध प्राशन केल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रा. रु. लाखांदुर येथे नेवुन उपचारा करुन पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गि—हेपुंजे पोस्टे लाखांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनी. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक १७/०९/०१६ रोजी २०.२० ते २०.५० वा. दरम्यान यातील आरोपीने आपल्या ताब्यातील मारोती ओमनी क्र. एमएच ३६ एच ०२३८ चा चालक हा दारु पिवुन दारुचे नशेत खामतलाव चौक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आला, त्याचे ब्रिथ अलकोहल ॲनालॉझर मशिनव्दारे चेक केले असता अलकोहल मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोना. साबळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) भांडण करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. :-

दिनांक १६/०९/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील आरोपी फिर्यादीस तु मला शिविगाळ का करतेश असे म्हणुन फिर्यादीसोबत भांडण करून फिर्यादी चे मानेवर डावे बाजुला ब्लेडने मारूण जखमी केले. असे फिर्यादी योगेश राधेश्याम कांबळे वय २२ वर्ष रा. भंडार यांचे तोंडी, डॉ. मेमो व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६,भादवी. अवये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक १७/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.